# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १३३/२०२५

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता निवड समितीव्दारे शिक्षकी पदे भरतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये विद्यापीठ निवड समिती अथवा स्थानिक निवड समितीद्वारे नियुक्त केलेल्या अध्यापकांना मान्यता देण्यासाठीचे प्रस्ताव प्राप्त होतात. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ या वर्षामध्ये विद्यापीठ निवड समिती अथवा स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त करण्यात येणाऱ्या अध्यापकांचे निवड समिती अहवाल व शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी विद्यार्थी संख्येनुसार कार्यभार तपासून घेवून विहित प्रक्रियेचा अवलंब करून नियमित कायमस्वरूपी (Permanent) अध्यापकीय पदे भरण्याची कार्यवाही करावी.

२. Government of Maharashtra, Law and Judiciary Department, Maharashtra Act No. VIII of 2004 मधील कलम ३(१)(ग) नुसार ४५ दिवसापेक्षा जास्त कालावधींच्या नियुक्त्यांसाठी आरक्षण लागू असल्याने अध्यापकांची पदे स्थानिक निवड समितीद्वारे तदर्थ स्वरूपात **(Adhoc)** भरताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी. **तसेच जाहिरात प्रसिध्द करण्यापूर्वी महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आरक्षण धोरणानुसार त्यांच्या स्तरावर आरक्षण निश्चिती करून त्याची पडताळणी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाकडून करून घेणे अनिवार्य आहे. तद्नंतरच जाहिरातीची प्रक्रिया राबविण्यात यावी.**

३. स्थानिक निवडसमितीव्दारे पूर्णवेळ तदर्थ (Adhoc) स्वरूपातील शिक्षकी पदे भरतेवेळी भरावयाच्या एकूण पदांचे आरक्षण सोबत जोडण्यात आलेल्या विहीत नमुन्यातील प्रपत्रामध्ये संस्थेच्या मा. अध्यक्ष/सचिव यांच्या सही शिक्क्यानीशी आरक्षण कक्षामध्ये पडताळणीकरिता संस्थेच्या लेटरहेडवर सदर पदांच्या भरतीच्या आरक्षणाची मागणी नमूद करून सादर करण्यात यावे. **सदर प्रपत्रासोबत मान्यता मिळालेल्या शिक्षकी पदांचा कार्यभार (Workload) जोडण्यात यावा. स्थानिक निवड समितीमध्ये संस्थेचे मा. अध्यक्ष यांनी नामनिर्देशित केलेल्या आरक्षित प्रवर्गातील आरक्षण प्रतिनिधीचा समावेश असणे आवश्यक आहे.**

४. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करीता स्थानिक निवड समितीद्वारे **तदर्थ (Adhoc)** स्वरूपात किंवा **तासिका तत्वावर (C.H.B.)** अध्यापकांची नेमणूक करण्यासाठी दि. ०९/०६/२०२५ ते दि. ३०/०९/२०२५ या कालावधीत स्थानिक निवड समितीचे आयोजन करण्यात यावे. तसेच ज्या दिवशी स्थानिक निवड समितीचे आयोजन केलेले आहे त्यानंतर ४८ तासांच्या आत निवड समिती अहवाल ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्यात यावा व मूळ निवड समिती अहवाल ७२ तासांच्या आत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा. तसेच शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दहा दिवसाच्या आत शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने अपलोड करून **"प्रोफार्मा–बी"** सोबत शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यात यावेत. तसेच सदर प्रस्ताव विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५. शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये ज्या अध्यापकांना त्याच महाविद्यालयात/परिसंस्थेत शिक्षक मान्यता देण्यात आलेल्या आहेत, फक्त अशा अध्यापकांचे शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करीताचे मुदतवाढीचे **(continuation)** प्रस्ताव संस्थेच्या ठरावासह, नेमणूक आदेश, रूजू अहवाल, शैक्षणिक अर्हता, शोध निबंध प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने दि. ०९/०६/२०२५ ते दि. ३०/०९/२०२५ पर्यंत अपलोड करण्यात यावीत. **तसेच अपूर्ण व अस्पष्ट प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची संबंधित महाविद्यालय/संस्थेने नोंद घ्यावी.**

28/5/2025

(स. द. डावखर)
उपकुलसचिव

जावक क्र. सीसीओ/१७४९
दिनांक — २८ मे, २०२५

प्रत :— मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

**Ad-hoc प्रपत्र**

# शैक्षणिक वर्ष : २०२५-२०२६

**स्थानिक निवड समितीद्वारे पूर्णवेळ तदर्थ स्वरुपात भरावयाच्या शिक्षकी पदांचे आरक्षण प्रमाणपत्र**

**(अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित)**

**संस्थेचे नाव** :

**महाविद्यालयाचे नाव** :

**विद्यापीठ संलग्नित क्रमांक** :

**रोस्टर आय.डी. (क्रमांक)** :

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता भरावयाच्या पूर्णवेळ तदर्थ स्वरुपातील (Ad-hoc) शिक्षकी पदांचे सामाजिक आरक्षण**

| अ. क्र. | पदनाम | विषय | कार्यभारानुसार मंजूर पदसंख्या | भरावयाची पदसंख्या | सामाजिक आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| ६. | | | | | |
| ७. | | | | | |
| ८. | | | | | |
| ९. | | | | | |
| १०. | | | | | |
| | एकूण | | | | |

आमच्या संस्थेची अन्य महाविद्यालये इतर विद्यापीठाशी संलग्नित नाहीत. उपरोक्त नमूद पदांची माहिती खरी असून त्यानुसार स्थानिक निवड समितीद्वारे पूर्णवेळ तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात शिक्षकी पदे भरण्याकरीता उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या आरक्षणाची पडताळणी करुन मिळावी, ही विनंती.

**अध्यक्ष/सचिव**
**सही व शिक्का**

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, न्यायाप्र-२०१४/(प्र.क्र.३२१/१४) विशि-१, दि.२४.०८.२०१५, मा.उच्च न्यायालय, (औरंगाबाद खंडपीठ) येथे दाखल केलेल्या याचिका क्र. १२०५१/२०१५ महाराष्ट्र सर्व बहुजन शिक्षक मंडळ विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर मधील मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयास अधीन राहून, **शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दि. २७ फेब्रुवारी २०२४** नुसार दि.__/__/____रोजी वरीलप्रमाणे सामाजिक आरक्षणाची पडताळणी करुन देण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दि.२५.०१.२०२४ व उच्च व तंत्र शिक्षण विभाग परिपत्रक क्र.संकिर्ण २०२४/ई ७२२५५०/विशि-१, दि.२९.०१.२०२४ प्रमाणे समांतर आरक्षणाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)